# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ / चैत्र ३, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **गृह मंत्री** | |
| **(२)** | **महसूल मंत्री** | |
| **(३)** | **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **कृषि, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

### आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील जमिनदाराने इनाम म्हणून मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता विकल्याबाबत

**(१) * ३९३५४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका जमिनदाराने इनामात मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता मे. विराज प्रोफाईल प्रा.लि. यांना विकल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) मौजे आमगांव, ता.वाडा येथील मे. विराज प्रोफाईल प्रा.लि. कंपनीच्या नावावर असलेले क्षेत्र १०५.७७ हे.आर जमिनीस महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतन ॲक्ट, १९५० च्या तरतूदी लागू असल्याने प्रस्तुत जमिनीच्या गा. न. नं ७/१२ सदरी इतर हक्कात "सदर जमिनीचा उपयोग शेतीकडेच करावा. शेती व्यतिरिक्त उपयोग केल्यास बाजारभावाप्रमाणे ५० टक्के दंड भरावा लागेल" अशी नोंद ठेवण्यात आलेली आहे.

विषयांकित मिळकत मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. कंपनीने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेली आहे. सदरचे क्षेत्र तत्कालीन तरतुदीअन्वये १० हेक्टर पेक्षा अधिक असल्याने विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १४.०९.२००६ च्या परवानगीने खरेदी केलेले आहे.

मौजे आमगांव, ता.वाडा येथील मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. कंपनी व निरज राजू कोचर व इतर यांचे नावे असलेल्या क्षेत्राबाबत विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४.०९.२००६ रोजी दिलेले परवानगी आदेश हे त्यांच्या दिनांक २४.०४.२०१७ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. यांनी सदरहू जमीन बिनशेती / बांधकाम परवानगीसाठी अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारचा अर्ज केलेला आढळून आलेला नाही. सबब, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ चा भंग केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांचे स्तरावर सुनावणी सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोळेगांव (ता.जामोद, जि.जळगांव) येथे वाळू माफियांनी एका व्यक्तीस जिवे मारण्याचा केलेला प्रयत्न

**(२) * ३८५१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोळेगांव (ता.जामोद, जि.जळगांव) येथे वाळू माफियांतर्फे वाळू वाहतूक करण्यास विरोध केल्याने वाळू माफियांनी एका व्यक्तीस विष पाजून जिवे

मारण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वाळू माफियांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) अंशत: खरे असून, आरोपीने त्याच्या दोन साथीदारांसह गोळेगाव खुर्द येथे फिर्यादी यास, घरासमोरुन जाणाऱ्या वाहनांमुळे घरात धूळ येत असल्याची तक्रार केल्याने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी जीवे मारण्याच्या उद्देशाने विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

(२) सदर प्रकरणी गु.र.नं.१९/२०२२, भा.दं.वि. कलम ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना मा. सत्र न्यायालयाने अटकपूर्व अंतरिम जामीन दिला असून तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## श्री दत्त विशाल मजूर सहकारी संस्थेत (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) झालेला अपहार

**(३) * ४२८२५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री दत्त विशाल मजूर सहकारी संस्था गणेशपूर (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील अध्यक्ष व इतर आठ जणांविरोधात पोलीस स्टेशन येथे नऊ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार दाखल करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार मजूर सहकारी संस्था २५% कमिशन घेवून काम करीत असून त्यातून ९ कोटी रुपयांचा अपहार केल्याबाबत तक्रार केली असूनही कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) व (३) सदर तक्रार अर्जदार यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था गडचिरोली या कार्यालयात दिली होती. त्यावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था गडचिरोली या कार्यालयाने सखोल चौकशी केली आहे. त्याबाबतचा चौकशी अहवाल स्वत: अर्जदार यांनी पोलीस स्टेशन आरमोरी येथे दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दाखल केला आहे. सदर चौकशी अहवालात मागिल तीन वर्षात सदर संस्थेस ४४०.७५ लक्ष रुपयांची कामे मिळाली असल्याने ९ कोटीचा अपहार होणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे.

सदर अर्जावर चौकशी चालु असुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४) * ४३१२८ श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधावर सलग पद्धतीने फळबाग लागवडीसाठी सन २०२१-२०२२ या कालावधीत प्रस्ताव सादर केल्याचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिलेली असतानाही डाटा एंट्री ऑपरेटर यांच्यामार्फत अनेक प्रस्ताव (अंदाजपत्रक) ऑनलाईन करण्याचे प्रलंबित ठेवल्याने अनेक शेतकरी या फळबाग लागवड योजना राबवू शकल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करुन सदर प्रस्ताव विहित कालावधीत ऑनलाईन करुन योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात फायनान्स कंपन्यांचे वसूलीदार नागरिकांना धमकावित असल्याबाबत

**(५) * ३८९७० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात फायनान्स कंपन्यांकडून कोरोनाच्या महामारीमुळे तेथील नागरिक हप्ते देऊ न शकल्याने त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व दमदाटी करीत असून वाहनांची परस्पर विक्री करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या वसूली एजंटांकडून होत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नागरिक पोलिस ठाण्यामध्ये तक्रार करण्याकरिता गेल्यानंतर त्यांना गुन्हेगाराची वागणूक देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत सायबर पोलीस स्टेशन, पुणे येथे ५५८ तक्रारी अर्ज प्राप्त असुन त्यापैकी ५२ अर्ज संबधित पोलीस स्टेशनकडे चौकशीकरिता पाठविले आहेत. तसेच १० अर्ज तक्रारदार यांच्या सहमतीने दप्तरी दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित ४९६ अर्जामध्ये चौकशी चालु आहे. तसेच चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे येथे वसूली एंजटकडून महिलेचा विनयभंग केल्याबाबत गु.र.क्र. ३५/२०२२ भा.दं.वि. ३५४ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

तसेच मुंढवा पोलीस स्टेशन येथे याबाबत गु.र.क्र.०१/२०२२ भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (अ), ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

तसेच असे दोन अन्य प्रकरणी सन २०२२ मध्ये कोरेगाव पार्क येथे अदखलपात्र गुन्हे नोंद आहेत.

पोलीस अधिकारी यांचेकडून फायनान्स कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेवून रिकव्हरी करताना घ्यावयाची काळजी व सामान्य जनतेबाबत त्यांची वागणूक याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धपुर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील रोजगार हमी फळबाग लागवड योजनेंतर्गत अधिकाऱ्यांनी केलेला गैरप्रकार

**(६) * ४३९०९ श्री.दादाराव केचे (आर्वी)** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धपुर (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शेतकरी श्री.बाबाराव शामरावजी ढोंगे यांना रोजगार हमी फळबाग लागवड योजनेंतर्गत सन २०१८-१९ या कालावधीत मंजूर झालेल्या योजनेत शेतकऱ्यांना तीन वर्षामध्ये रुपये ५४,०००/- मिळणे अपेक्षीत असताना फक्त रुपये १५,०००/- देण्यात येवून इतर रक्कम रोजगार सेवक, ग्रामसेवक यांनी संगनमत करुन त्यांच्या विश्वासातील लोकांची नावे टाकून त्यांच्या नावावर रक्कम वळती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी ज्येष्ठ नागरिक श्री.साहेबराव वानखेडे वय ६४ वर्ष हे वयोवृध्द असून कोणतेही मजूरीचे काम करण्यास असमर्थ असूनही त्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत राजीव गांधी भवन बांधकामाचे मजूर दाखवून रुपये १४४२/- एवढी रक्कम जमा करुन त्यांच्याकडून बळजबरीने खात्यातून पैसे काढून घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात श्रीमती सविता उमेशराव ब्राम्हणे यांना रमाई घरकुल योजनेंतर्गत घर बांधकाम मंजूर होऊन त्यांना कुशल कामाची रक्कम पूर्ण अदा करण्यात आल्याने त्यांना अकुशल कामाचे रुपये १८,०९०/- मिळणे अपेक्षीत असताना संबंधीत कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यास रुपये २८००/- देवून उर्वरित रक्कम विश्वासातील लोकांच्या नावे वळती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ११ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम मंजूर करण्यात आल्याने लाभार्थी यादीत श्री.नत्थुजी ज्योतीराम कोल्हे व त्यांची पत्नी श्रीमती तुळशाबाई नत्थुजी कोल्हे या संयुक्त कुटुंबात दोघांच्याही नावे शौचालय मंजुर करण्यात आल्याने प्रत्यक्षात एकच शौचालयाचे बांधकाम करण्यात आले, परंतु, दोन्ही शौचालयाचे अनुदान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ मध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असून याची चौकशी करुन संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) नाही.

श्री.बाबराव ढोंगे यांना फळबाग लागवड योजनेंतर्गत केलेल्या कामाच्या रु.२९,४२१/- इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे. प्राकलनानुसार काम केले नसल्याने उर्वरित रु.२४७८५/- अदा करण्यात आलेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, सविता उमेश ब्राम्हणे यांना रु.१४,२७३/- इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे. उर्वरीत अनुदान तांत्रीक अडचणीमुळे प्रलंबीत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मुद्दा क्र.१, २, ३ व ४ मध्ये मुद्दयानुसार गैरप्रकार झाला असल्याचे मुद्दयात नमुद आहे. परंतु प्रत्यक्षात मुद्दा क्र. २ व ४ मध्ये गैरप्रकार झाला असल्याचे दिसून आले. त्यानुसार मुद्दा क्र. २ ची रक्कम १४४२/- व मुद्दा क्र. ४ ची रक्कम रु. १२०००/- वसुल करुन शासन खाती जमा करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित रोजगार सेवक, ग्रामसेवक व पॅनल तांत्रीक अधिकारी यांचे कारणे दाखवा नोटीसनुसार खुलासा सादर करण्यात आलेला आहे. त्यांच्या खुलाश्यानुसार संबंधित तत्कालिन ग्रामसेवक, पॅनल तांत्रिक अधिकारी, (कृषि) व ग्रामरोजगार सेवक यांना सक्त ताकीद देण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयात सात-बारा व फेरफार संकल्पना नोंदी प्रलंबित असल्याबाबत

**(७) * ४२७४४ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नागरिकांचा त्रास कमी होण्याकरीता ऑनलाईन सात-बारा व फेरफार संकल्पना आणली असली तरी सोलापूर जिल्हयात ७ हजार ३०० पेक्षा अधिक नोंदी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी, मंडलाधिकारी यांच्याकडे नागरिक वारंवार जात असूनही सात-बारा व फेरफार संकल्पनेच्या नोंदी घेतल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिरंगाई करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) जमिनीच्या व्यवहाराबाबत फेरफार नोंदी प्राप्त होणे व निर्गत करणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत विकसीत ई-फेरफार डॅशबोर्डनुसार दिनांक २८/०२/२०२२ रोजी सोलापूर जिल्हयात नोंदणीकृत २९९० आणि अनोंदणीकृत ४३०७ अशा एकूण ७२९७ फेरफार नोंदी प्रलंबित आहेत. यासंदर्भात राज्यात सुरु असलेल्या ई-फेरफार प्रणालीअंतर्गत सर्व महसुली अधिकाऱ्यांसमवेत साप्ताहिक आढाव्याद्वारे जिल्हयातील प्रलंबित फेरफार निर्गत करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावर घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागातील विविध पदे रिक्त असल्याबाबत

**(८) * ४०९०४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागातील १८ विविध पदे रिक्त असल्यामुळे सुमारे दीड लाखाहून अधिक असलेल्या पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पशुसंर्वधन विभागाची इमारत देखील धोकादायक अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागांतर्गत एकूण ४१ पदे मंजूर आहेत. यापैकी १९ पदे भरलेली असून, २२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमितपणे पशुसंवर्धन विषयक सेवा पुरविण्यात येत आहेत. त्यामुळे पशुधनाचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१, राजापूर या संस्थेची इमारत नादूरुस्त असल्यामुळे त्याच प्रांगणात उपलब्ध असलेल्या पशुधन विकास अधिकारी निवासस्थानाच्या इमारतीमध्ये सदर पशुवैद्यकिय दवाखाना तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यांत आलेला असून तेथून संस्थेचे कामकाज नियमितपणे चालू असून, पशुपालकांना नियमीतपणे पशुसंवर्धन विषयक सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) विभागातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची २१२ रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र. १२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली असून त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. तसेच वित्त विभागाच्या सूचनांनुसार विभागाचा आकृतीबंद सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून तद्नंतरच गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे. पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१, राजापूर या दवाखान्याच्या दुरुस्तीसाठी सन २०२२-२०२३ या वर्षात पशुवैद्यकिय दवाखान्याचे बांधकाम बळकटीकरण व आधुनिकीकरण

जिल्हा परिषदेकडील पशुवैद्यकिय दवाखाने/प्रथमोपचार केंद्र बांधणे यामधून रुपये ३.०० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत कीटक संगोपनगृहाचे बांधकाम केलेल्या लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत

**(९) * ४३१३८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०१४-१५ या कालावधीतील कीटक संगोपनगृह (रेशीम शेड) बांधकाम केलेल्या पात्र ३६ लाभार्थ्यांना प्रती कीटक संगोपनगृह बांधकाम खर्च रुपये ८७,५००/- प्रमाणे रुपये ३१,५०,०००/- (रुपये एकतीस लक्ष पन्नास हजार) अनुदान रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी शेड उभी करुन सहा ते सात वर्षांचा कालावधी होऊन गेल्याने खास बाब म्हणून जिल्हा वार्षिक योजनेमधून वाढीव तरतूद उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हा रेशीम अधिकारी, बीड यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर करुनही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सन २०१४-१५ या कालावधीत व त्यापूर्वी सीडीपी योजनेंतर्गत कीटक संगोपनगृह बांधकाम योजना बंद होऊन सन २०१५-२०१६ या कालावधीपासून सदर योजना राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१५-२०१६ व तत्पूर्वी कीटक संगोपनगृह बांधकाम केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदानाच्या मागण्या संबंधित जिल्हा नियोजन विकास निधीतून भागविण्यात याव्यात असे शासनाचे निर्देश आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जिल्हा वार्षिक योजनेमधून खास बाब म्हणून रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचे शेडचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) होय.

(२) होय.

(३) केंद्र पुरस्कृत सीडीपी योजनेंतर्गत कीटक संगोपनगृह बांधकाम अनुदान योजना सन २०१५-१६ पासून बंद झाल्यामुळे सन २०१५-१६ मध्ये तुती लागवड केलेल्या शेतकऱ्यांना कीटक संगोपनगृह बांधकामाकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून अनुदान उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

(४) व (५) उक्त शासन निर्णयातील अट क्र.८ नुसार कीटक संगोपनगृह बांधकाम हे सन २०१५-१६ या वर्षात तुती लागवड केलेल्या शेतकऱ्यांसाठी अनुज्ञेय असून जुने संगोपनगृहास (सन २०१५-१६ च्या आधीच्या वर्षाचे) अनुदान अनुज्ञेय नाही. त्यामुळे सन २०१४-१५ व तत्पूर्वी कीटक संगोपनगृह बांधकाम केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांच्या अनुदानाच्या मागण्या संबंधित जिल्हा नियोजन विकास निधीतून भागविण्याबाबत संचालक (रेशीम) व संबंधित जिल्हाधिकारी तथा सदस्य-सचिव, नियोजन विकास समिती यांना कळविण्यात आले होते. तथापि, कीटक संगोपनगृह बांधकाम अनुदान ही बाब जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अंतर्भूत नसल्याने जिल्हा वार्षिक योजनेतून निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे सन २०१४-१५ व तत्पूर्वी केंद्र पुरस्कृत सीडीपी योजनेंतर्गत कीटक संगोपनगृहाचे बांधकाम केलेल्या बीड व राज्यातील इतर जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित अनुदान सद्य:स्थितीत सुरु असलेल्या केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र (ISDSI) योजनेतून देण्याबाबत केंद्रीय रेशीम मंडळाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी, असे संचालक (रेशीम) यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार रेशीम संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील एकात्मिक फलोत्पादन योजनेंतर्गत शेडनेट-हरीतगृह लाभार्थी निवडीमध्ये अनियमितता होत असल्याबाबत

**(१०) * ३९५३६ श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील एकात्मिक फलोत्पादन योजनेंतर्गत शेडनेट व हरीतगृह लाभार्थी निवडीमध्ये मागील ३ वर्षापासून अनियमितता होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगरी भागासाठी लाभार्थींना शासनाने १५ टक्के वाढीव मंजूर केलेले अनुदान साक्री (जि.धुळे) तालुक्यास देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी निवडीमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन लाभार्थींना वाढीव अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील डोंगराळ भागातील ११५ लाभार्थींना रुपये ७०३.०६ लाख एवढा निधी १५ टक्के वाढीव अनुदानासह वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चिकुर्डे (ता.वाळवा, जि. सांगली) येथील शेतकऱ्यांच्या ऑनलाईन सातबारा उताऱ्यावर भोगवटा वर्ग १ व २ अशा नोंदी झाल्यामुळे शेतकऱ्यांची मुदत कर्ज नामंजूर होत असल्याबाबत

**(११) * ३९८२० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिकुर्डे (ता.वाळवा, जि.सांगली) येथील शेतकऱ्यांच्या ऑनलाईन सातबारा उताऱ्यावर भोगवटा वर्ग १ व २ अशा नोंदी झाल्यामुळे शेतकऱ्यांची मुदत कर्ज नामंजूर होत असल्याने पूर्वी प्रमाणे मंजूर व्हावी अशी मागणी तेथील शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मौजे चिकुर्डे, ता.वाळवा, जि.सांगली येथे दिनांक २९/११/२०२१ रोजी शेतकऱ्यांच्या अडचणी संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये काही खातेदारांनी ऑनलाईन सातबारा उताऱ्यावर भोगवटादार वर्ग १ व २ अशा नोंदी झाल्यामुळे मुदत कर्ज नामंजूर होत असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यानुषंगाने पडताळणी केली असता हस्तलीखीत ७/१२ व संगणीकृत ७/१२ मधील धारणाधिकारामध्ये विसंगती असल्याचे दिसून आले नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात अंमली पदार्थाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याबाबत

**(१२) * ४१५७२ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात पोलीसांच्या अंमली पदार्थविरोधी पथकाच्या कांदिवली युनिटच्या अधिकाऱ्यांनी घाटकोपर-अंधेरी लिंक रोडवर सापळा रचून परराज्यातून येणारे अंमली पदार्थ जप्त केले व त्याची किंमत सुमारे तीस लाख असून याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, याप्रकरणी माहूल गावामध्ये केलेल्या कारवाईत एकाला अटक करुन त्यांच्याकडून १८ लाखांचे एमडी अंमली पदार्थ जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात अंमली पदार्थ तस्करीमध्ये मुंबईसह राज्यात वाढ होत असल्याने अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई अंतर्गत कांदिवली युनिटमार्फत केलेल्या कारवाईमध्ये दिनांक २३.०१.२०२२ रोजी दोन इसमांकडून रुपये २८,७५,०००/- किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त करून सदर आरोपितांना अटक करण्यात आली आहे.

(२) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई अंतर्गत घाटकोपर युनिटमार्फत केलेल्या कारवाईमध्ये दिनांक २३.०१.२०२२ रोजी माहूल परिसरात एका इसमाकडून १२० ग्रॅम वजनाचा रुपये १८,००,०००/- किंमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ जप्त करून सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(३) अंमली पदार्थ विरोधी कारवाई अंतर्गत प्रभावी तपासाबरोबरच वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीमा घेण्यात येतात. तसेच जनतेने अंमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये म्हणून जनजागृतीच्या उद्देशाने “२६ जून” या अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा साजरा करण्यात येतो. याशिवाय वेळोवेळी अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत जनतेस तसेच विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाखारी (ता.दौंड, जि.पुणे) येथे शासनाच्या जमिनीवर बोगस खातेदारांची नावे लावून झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१३) * ३८४३७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाखारी (ता.दौंड, जि.पुणे) येथे शासनाच्या १३ एकरहून अधिकच्या जमिनीवर बनावट खातेदारांची नावे लावून गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी देखील या गावात सिलिंग जमिनीबाबत असे गैरप्रकार घडल्याने यामध्ये शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे वाखारी, ता.दौंड, जि.पुणे येथील गट नं. २२०/४ मधील ५ हे. ७६ आर क्षेत्रावरील सरकार नाव कमी करून खरेदी-विक्रीचे व्यवहार झाल्याबाबतचा गैरव्यवहार झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मौजे वाखारी, ता. दौंड जि. पुणे येथील एकूण ६८ गट तपासलेले असून त्यापैकी गट नं. २२०/४ मध्ये सरकार नाव कमी करून खरेदी-विक्रीचा गैरव्यवहार करण्यात आलेला होता. या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने तहसिलदार यांच्या स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशीमध्ये तत्कालीन तलाठी व मंडल अधिकारी यांनी जाणीवपुर्वक चुक केल्याचे दिसून आल्याने तत्कालीन ३ तलाठी व तत्कालीन मंडळ अधिकारी दोषी आढळून आल्याने त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव दिनांक २८/०२/२०२२ रोजी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलेला आहे.

तथापि, मौजे वाखारी, ता. दौंड जि. पुणे येथील गट नं. २२०/४ मधील क्षेत्रावर दिनांक २१/०२/२०२२ च्या आदेशान्वये सरकार नाव दाखल करून इतर हक्कात सिलींग शर्त शेरा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयासह खान्देशातील पशुधनासाठी लसीकरण मोहिम राबविण्याबाबत

**(१४) * ४२५९७ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयासह खान्देशातील पशुधन धोक्यात आले असून अनेक भागात लंपी स्कीन व लाळ खुरकुत या रोगाची साथ आली असतानाही

जनावरांचे लसीकरण, प्रतिबंधात्मक उपचारासंबंधीची कार्यवाही संथ गतीने होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना खाजगी पशुवैद्यकांच्या मदतीने लसीकरण करुन घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने जनावरांचे तातडीने लसीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) जानेवारी, २०२२ वा त्यादरम्यान जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयात लंपी स्किन व लाळ खुरकुत रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही.

तथापि माहे ऑगस्ट, २०२१ ते ऑक्टोंबर २०२१ या कालावधीत जळगाव, धुळे व नंदुरबार या खान्देशातील जिल्हयांमध्ये जनावरांतील लंपी स्किन रोगाचे निदान झाले होते. त्यानंतर १७,६८१ बाधीत जनावरांवर तात्काळ उपचार करण्यात आले असून उपचाराअंती सर्व जनावरे बरी झाली आहेत. लंपी स्किन रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बाधीत गावातील व ५ कि.मी. परिघातील एकूण ४,७३,६८९ (१००%) जनावरांचे प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण करण्यात आलेले आहे.

तसेच राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत लाळ खुरकूत रोगावरील प्रतिबंधात्मक लसीकरणाची दुसरी फेरी जळगाव जिल्हयात दिनांक ३०.१०.२०२१, धुळे जिल्हयात दिनांक १८.११.२०२१ व नंदुरबार जिल्हयात दिनांक ०९.१२.२०२१ पासून सुरु झालेली असून आजअखेर ११,११,९६२ जनावरांना लसीकरण करण्यात आले आहे. सदर योजने अंतर्गत लाळ खुरकूत रोगावरील लस मात्रांचा राज्यास पुरवठा ५ टप्प्यांमध्ये झालेला आहे. सदर लस मात्रांचा पुरवठा झाल्यानंतर किंवा आवश्यकतेनुसार शेजारील जिल्हयातुन लस मात्रा उपलब्ध करुन लसीकरण पूर्ण करण्यात येत आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे.पंचगंगा सीड्स कंपनी प्रा.लि.औरंगाबाद येथे कृषि विकास अधिकारी यांनी केलेल्या तपासणीत बनावट बियाणांचा अवैध साठा आढळून आल्याबाबत

**(१५) * ४३९०७ श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर), श्री.अनिल पाटील (अमळनेर)** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी मे.पंचगंगा सीड्स कंपनी प्रा.लि.औरंगाबाद येथे बियाणे अधिनियम, नियम व नियंत्रण आदेशांतर्गत तपासणी केली असता भेंडी व वांगी या बनावट बियाणांचा ७५ टनाचा अवैध साठा आढळून आल्याचे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.पंचगंगा सीड्स कंपनी प्रा.लि.औरंगाबाद यांनी बियाणे विक्री परवाना नुतनीकरण केलेले नसणे, परवाना दर्शनी भागावर लावलेला नसणे, पुरवठा साठा फलक, भाव फलक व साठा रजिस्ट्रर उपलब्ध नसणे, बियाणे विक्री रजिस्ट्रर व शिल्लक साठा जुळत नसणे, मुदत बाह्य बियाण्यांचा साठा नोंद वहीत शेरा मारुन ठेवलेला नसणे इत्यादी त्रुटीमुळे सदर कंपनीचा परवाना रद्द करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि विभाग या बनावट बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपनीला पाठीशी घालत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कंपनीचा बियाणे परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

मे.पंचगंगा सीड्स कंपनी प्रा.लि. औरंगाबाद या बियाणे कंपनीच्या साठवणुक केंद्राच्या तपासणी वेळी कंपनीच्या बियाणे परवान्यात समाविष्ट नसलेल्या भेंडी पिकाच्या क्रांती-२९३ वाणाचे ७.५ मे.टन बियाणे आढळून आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

क्रांती-२९३ हे वाण कंपनीच्या परवान्यामध्ये समाविष्ट नसल्यामुळे कायद्यातील तरतुदीनुसार विक्री बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच सदरचे वाण डी.एन.ए. फिंगरप्रिंट द्वारे सत्यता पडताळणीकरीता प्रयोगशाळेत पाठविण्याचे निदेश देण्यात आलेले आहे. कंपनीने बियाणे कायद्यातील तरतुदींचा भंग केल्याचे आढळुन आल्याने मे.पंचगंगा सीड्स प्रा.लि. औरंगाबाद या बियाणे कंपनीचा परवाना दिनांक ०९ मार्च, २०२२ रोजीच्या आदेशान्वये पुढील आदेश होईपर्यंत निलंबित करण्यात आलेला आहे. तसेच सदर आदेशाच्या दिनांकापासुन परवान्यातील वाणाची विक्री करु नये अथवा इतरत्र हलवु नये वा त्याची विल्हेवाट लावु नये असेही कंपनीला आदेशित केलेले आहे. तसेच सदर प्रकरणी प्रधान सचिव (कृषि) यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येऊन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.वाशिम) येथील अंजनकर ज्वेलर्सचे संचालक व सहकाऱ्यावर अज्ञातांनी केलेला गोळीबार

**(१६) * ४३७११ श्रीमती श्वेता महाले (चिखली)** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) येथील अंजनकर ज्वेलर्सचे मालक श्री.योगेश गजानन अंजनकर हे नेहमीप्रमाणे दुकान बंद करुन पैशांची बॅग घरी घेऊन जाताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्यावर व त्यांच्या नोकरावर चाकूने वार करुन रात्री नऊ वाजता दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास देशी कट्टयाने गोळीबार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेमध्ये सहकारी श्री.रवी वाळेकर हे गंभीर जखमी झाल्याने वाशीम येथे तत्काळ नेण्यात आले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) होय.
(४) मालेगाव पोलीस स्टेशन जि. वाशिम येथे अप. क्र. ५२२/२०२१ कलम ३९६,३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून भादंवि कलम १२०(ब) सहकलम ३, २५ आर्म अॅक्ट समाविष्ट करण्यात आला आहे. एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याबाबत

**(१७) * ४३४७७ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँक, यवतमाळ या बँकेत मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याच्या अनेक तक्रारी होऊनही पोलिस अधिक्षक, यवतमाळ गुन्हा दाखल करुन घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बँकेच्या संचालक मंडळाने संगनमत करुन बनावट अर्ज वाटप, कर्ज बुडीत करणे तसेच मालमत्तांचा कमी किंमतीत लिलाव करणे असे प्रकार करुन रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संचालक मंडळातील संबंधित दोषी सदस्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) सहकार आयुक्त कार्यालयाने बाबाजी दाते महिला सहकारी बँकेची अधिनियमाचे कलम ८९ (ए) अन्वये चौकशी करण्याकरीता नियुक्त केलेल्या जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांनी बँकेच्या कामकाजाबाबत अनेक अनियमितता आढळून आल्याचे दिनांक ०३.११.२०२१ रोजी सादर केलेल्या अहवालात नमुद केले आहे.

दरम्यान रिझर्व्ह बँकेने बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ चे कलम ३५ ए मधील तरतूदीनुसार दिनांक ०८.११.२०२१ रोजीच्या आदेशाने बाबाजी दाते महिला सहकारी बँकेवर सर्वसमावेशक निर्बंध लादले. त्यानुषंगाने बँकेस ठेवीदारांना रुपये ५००० रक्कमेपेक्षा आधिक रक्कम अदा करण्यास मनाई करण्यात आली होती. त्यामुळे काही ठेवीदारांनी सदर बँकेविरुध्द पोलिस अधिक्षक, यवतमाळ यांचेकडे तक्रार दाखल केली होती. परंतु पोलिस विभागाकडून एफ.आय.आर. दाखल झालेली नाही.

(२) व (३) सदर बँकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालामध्ये बँकेच्या कामकाजामध्ये गंभीर दोष निदर्शनास आलेले आहेत. तसेच बँकेचा कलम ८९ (ए) अन्वये सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, सहकार आयुक्तांनी अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग १, यवतमाळ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर चौकशी आदेशामध्ये अनियमित कर्जवाटप, पुरेशा तारणाशिवाय कर्जवाटप, चुकीच्या पध्दतीने ओ.टी.एस. योजना राबविणे, कर्ज वसूलीसाठी ठोस कारवाई न करणे इ. मुद्यांचा समावेश करण्यात आला असून चौकशीचा अहवाल दोन महिन्यात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान डी.आय.सी.जी.सी कडून रु.२५३ कोटी बँकेस प्राप्त झाले असून त्यामधून एकूण १४,००० ठेवीदारांना रु.५ लाखापर्यंतचे रु.२५२ कोटींच्या ठेवी अदा करण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरीत ठेवीदारांच्या ठेवींबाबत डी.आय.सी.जी.सी कडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यशवंत कॉलनी (जि.अहमदनगर) येथे एका विवाहितेचा संशयास्पद मृत्यु झाल्याबाबत

**(१८) * ४४१२६ श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंत कॉलनी (जि.अहमदनगर) येथे राहणाऱ्या एका विवाहीत महिलेचा संशयास्पद मृत्यु झाला. तथापि, पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने याबाबत पोलीसांनी भा.दं.वि.३०२ अन्वये गुन्हा नोंदवून तपास करावा अशा आशयाच्या केलेल्या तक्रारींची तोफखाना पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी दखल न घेतल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत्यूप्रकरणी विवाहितेच्या शवविच्छेदन अहवालात कॉलम १७ मध्ये मारहाणीच्या ११ खुणांचा उल्लेख असतानाही जाणीवपूर्वक कोणतीही दखल न घेता व त्यानुषंगाने तपास न करता पोलिसांनी सदर तपास बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी विवाहितेच्या कथित आत्महत्येनंतर कुटुंबियांकडून पोलिसांना कळविण्यात न येणे, मयत विवाहितेच्या पतीचे तसेच आई-वडिलांचे जबाब न नोंदवणे यासारखे संशयास्पद प्रकार असताना केवळ राजकीय दबावापोटी पोलीस तपास करत नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात संबंधित दोषींवर कारवाई होऊन मयत विवाहितेला योग्य तो न्याय मिळण्यासाठी सदर प्रकरण केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) यांच्याकडे सोपविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) सदर प्रकरणी पोलीसांनी भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदवून तपास करण्याबाबत अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) सदर प्रकरणातील विवाहितेच्या शव विच्छेदन अहवालातील कॉलम १७ मधील ११ खुणांपैकी अ.क्र.१ मधील खूण लिगेचर मार्क ही जखम मृत्युस कारणीभूत असल्याचे तसेच लिगेचर मार्क ही खूण गळफास घेतल्याने होत

असल्याचे शव विच्छेदन अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

वैद्यकिय अधिकारी यांच्या अंतिम अहवालानुसार गौरी प्रशांत गडाख यांनी गळफास घेतला असल्याचे नमूद आहे.

(३) पोलीसांकडून विवाहितेच्या आत्महत्येनंतर मृत महिलेच्या कुटुंबियांना चौकशीच्या अनुषंगाने संपर्क केला असता कुटुंबियांनी सदर महिलेच्या मृत्युबाबत तक्रार दिलेली नाही.

(४) सदर महिलेचा मृत्यू गळफास घेऊन आत्महत्या केल्याने झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असल्याने सदरचे प्रकरण केंद्रीय अन्वेषण ब्युरो यांच्याकडे सोपविण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

----------------

## अंधेरी (मुंबई) येथील वर्सोवा खाडीत गाळ साचल्याने मच्छीमारांच्या बोटींचे नुकसान झाल्याबाबत

**(१९) * ३८७३६ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा)** : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील वर्सोवा खाडीतील सुमारे ५५ लाख घन (क्युबिक) मीटर गाळ साचलेला असून सदर गाळामुळे मच्छीमाऱ्यांना मासेमारी करणे कठीण जात असून बोटींच्या होणाऱ्या अपघातांमुळे मच्छीमारांच्या बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा गाळ काढण्याबाबत तेथील मेरीटाईम बोर्डाला स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वर्सोवा खाडीतील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१९ च्या सर्वेक्षणानुसार १५,५२,४७९ घनमीटर गाळ (४ मीटर खोलीसाठी) व १६,१२८ घनमीटर खडक फोडणे अपेक्षित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) १) सन २०१८ मध्ये १,२५,५८६ घनमीटर गाळ काढणेत आला असून त्याकरीता रू.४.०० कोटी निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडून खर्च करण्यात आला आहे.

२) केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत वर्सोवा (अंधेरी) येथिल मत्स्यबंदराच्या रू.३६५.६६ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केंद्र शासनास दिनांक २१/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे. सदरच्या अंदाजपत्रकामध्ये वर्सोवा मत्स्यबंदरामधील गाळ काढण्याच्या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. मात्र केंद्र शासनाकडून अजून मान्यता मिळालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देगलूर (जि.नांदेड) येथील नगर परिषद हद्दीतील व तालुक्यातील जमिनीचे भोगवटदार वर्ग-२ चे भोगवटदार वर्ग-१ करण्याबाबत

**(२०) * ४०८४३ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) नगर परिषद हद्दीतील व तालुक्यातील एकुण २३८ मालमत्ता धारकांचे जवळपास ४०० एकर जमिनीचे भोगवटदार ०१ चे भोगवटदार वर्ग-०२ केल्याने देगलूर शहर व तालुक्यातील जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार बंद असल्याने मालमत्ता धारकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर परिषद हद्दीतील व तालुक्यातील भोगवटदार वर्ग-२ चे भोगवटदार वर्ग-०१ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) देगलूर, जि.नांदेड नगरपरिषद हद्दीतील व तालुक्यातील एकूण २३८ (गटाचे) मालमत्ताधारकाची जमीनीचा धारणाधिकार मूलत: भोगवटादार वर्ग-२ असा होता. शासनाच्या सर्व गा.न.नं.७/१२ नोंदी संगणकीकृत करण्याच्या धोरणानुसार अशी संगणकीकृत नोंद घेताना उक्त २३८ गटांची नोंद अनावधानाने वर्ग-२ ऐवजी वर्ग-१ अशी करण्यात आली. सदर बाब निदर्शनास आल्यावर तहसिलदार, देगलूर, जि.नांदेड यांनी दिनांक ३१.०७.२०२० आणि दिनांक ०४.०८.२०२० रोजीच्या आदेशान्वये सदर गटाच्या धारणाधिकारात झालेली वर्ग-१ अशी चूक दुरुस्त करुन पून्हा मूळ वर्ग-२ अशी नोंद घेण्याचे आदेश दिले आहेत.

(२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (महसूल) यांना दिनांक २३.११.२०२१ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे. तथापि, उक्त निवेदनात प्रश्नात नमूद केलेल्या २३८ गटाच्या जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ चा वर्ग-१ करण्याची विनंती करण्यात आली आहे. तथापि, सदर जमिनीचा धारणाधिकार मूलत: वर्ग-२ असल्याने तो सरसकट वर्ग-१ करणे उचित होणार नाही.

-----------------

## पश्चिम विदर्भातील महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या योजनांमध्ये अपहार झाल्याबाबत

**(२१) * ४३०८० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या योजनांमधील शेतकऱ्यांच्या ५० टक्के सहभाग म्हणजेच १.८३ कोटींचा लोकवाटा महामंडळाकडे जमा करण्यात न आल्याने ११ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय कृषी सहसंचालकांनी माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निलंबनाची कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) पश्चिम विदर्भातील पाच जिल्हयामध्ये एकूण ११० अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे रुपये १,८३,३५,९४२/- इतका लोकवाटा प्रलंबित आहे. सदर प्रलंबित रक्कमेपैकी रुपये ७६,०७,३४०/- इतकी रक्कम वसूल करुन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे भरणा करण्यात आलेली आहे. उर्वरित प्रलंबित लोकवाटा रक्कम वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

प्रलंबित रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करताना सदर प्रकरणी ११ कर्मचाऱ्यांना निलंबित केले असून यापैकी ३ कर्मचाऱ्यांनी पूर्ण रक्कम भरणा केली असल्यामुळे त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे. उर्वरित ८ कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथील शिवारातील चंदनाची लाकडे जप्त केल्याबाबत

**(२२) * ३७७८२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथील शिवारातील दोन फार्म हाऊसवर सहायक पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने छापा टाकून ६ क्विंटल १० किलो चंदनाची लाकडे, दोन कार, असा ३७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी किती आरोपींना अटक केली तसेच आरोपींविरुद्ध कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) शिवारात पोलीसांनी दोन फार्म हाऊसवर दिनांक २८.१२.२०२१ रोजी छापा टाकून ६००

किलो चंदनाची लाकडे, दोन कार असा एकूण रुपये २७ लाख इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

(२) व (३) पहिल्या फार्म हाऊस प्रकरणात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन चाकुर येथे गु.र.नं.५६७/२०२१, भा.दं.वि. कलम ३७९, ३४, व भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम ४१, ४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या फार्म हाऊस प्रकरणात ०४ आरोपी असून त्यांच्यापैकी एका आरोपीस अटककरण्यात आली आहे. त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशन चाकुर येथे गुरनं.५६८/२०२१, भा.दं.वि. कलम ३७९, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४ व भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम ४१, ४२ व महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मंडणगड, चिपळूण, गुहागर व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) येथील नदी पात्रातून बेकायदा वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२३) * ४१५०० श्री.सुनील राणे (बोरीवली)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड, चिपळूण, गुहागर व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) येथील नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा वाळू उपसा करून विविध परिसरात अवैध विक्री होत असतानाही सदरहू वाळू माफियाविरोधात कोणतीच कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बेकायदा वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करावी असे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी आदेश काढलेले असतानाही संबंधित अधिकारी व कर्मचारी हे आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अवैध वाळू उपसा थांबविण्यासठी वाळू पट्याचा लिलाव होणे गरजेचे आहे, परंतु यावर शासनाने स्थगिती दिली असतानाही या जिल्ह्यात ठिकठिकाणी संक्शन पंपाने बेकायदा वाळू उपसा सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्याने शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, बेकायदा वाळू उपसा करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) रत्नागिरी जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५६ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रु.२८.५१ लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ३ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

-----------------

## समुद्रपुर व हिंगणघाट (जि.वर्धा) येथे सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(२४) * ४१३२० श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील समुद्रपुर व हिंगणघाट तालुक्यातील १८५ गावातील १५ हजार २१९ शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लागवड केलेल्या सोयाबीन पिकांवर कीड या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नैसर्गिक आपत्ती नियमानुसार जर शेतकऱ्यांच्या शेतामधील उभे असलेले पीक ३० टक्क्यांच्यावर नष्ट झाल्यास शेतकरी शासकीय मदतीसाठी पात्र असल्याचा नियम आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सोयाबीन पिकाच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

३३ टक्केच्या वर पिक नुकसान असल्यास शेतकरी शासकीय मदतीसाठी पात्र असतो.

(३) होय, हे खरे आहे.

मा.जिल्हाधिकारी वर्धा यांनी दिनांक २६/०८/२०२० नुसार नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) नुकसान भरपाई बाबतचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागास सादर केला होता. परंतु, राज्य शासनाने मदतीसाठी निश्चित केलेल्या निकषाबाहेरील हा प्रस्ताव असल्याचे कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) येथे रोजगार हमी योजनेंतर्गत लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(२५) * ३७६८९ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा):** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथे परिमंडळात सन २०१९ या कालावधीत रोजगार हमी योजना विभागाने चांदूरबाजार, धारणी आणि चिखलदरा येथील ५८ ग्रामपंचायतीमध्ये २ कोटी ८१ लाख रुपये खर्च करुन उद्याने विकसित करणे, तलाव बांधणे, विहिरी खोदणे या कामासांठी ४ कंपन्यांना कंत्राट दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी केवळ ३ कंपन्यांनी काम पूर्ण केले असून एका कंपनीने काम न करता ८४ लक्ष रुपयांची देयके मंजूर करुन घेतली असल्याचे उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या अहवालामध्ये स्पष्ट झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी अशा प्रकारचा कोणताही अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर केलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रामटेक व मौदा (जि. नागपूर) येथे चुरडा व फुलकीडीच्या प्रादुर्भावामुळे मिरची पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(२६) * ३८३१० अॅड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक व मौदा (जि.नागपूर) येथे लागवड करण्यात आलेल्या मिरची पिकांवर चुरडा व फुलकीडीच्या प्रादुर्भावामुळे अनेक शेतकऱ्यांचे पिक उध्वस्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पिकांवर वारंवार महागड्या औषधांची फवारणी करूनही कीड नियंत्रणात येत नसल्याने नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करूनही शासकीय यंत्रणेमार्फत पंचनामे करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पंचनामे करून नुकसान भरपाई मंजूर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयात मिरची या पिकावर फुलकिडीचा प्रादुर्भाव झाल्याचे निर्दशनास येताच कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांसह शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देण्यात आल्या. तसेच शास्त्रज्ञांच्या सल्यांनुसार फवारणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मौदा व रामटेक तालुक्यातील नुकसानीचे तालुकास्तरावर पंचनामे करून (१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नागपूर, (२) मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर व (३) जिल्हाधिकारी, नागपूर यांचा अंतिम संयुक्त सर्वेक्षण अहवाल पुढील कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेलू (जि.परभणी) येथील पोलीस वसाहतींच्या निवासस्थानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२७) * ४०३४३ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची शासकीय निवासस्थाने असून या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याने पोलिस कर्मचारी कुटुंबियांना समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वसाहतीत ६४ निवासस्थाने असून अनेक वेळा दुरुस्त करूनही येथील सुविधा कमी झाली नसल्याने अधिकाऱ्यांसह अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी वसाहतीचा पुनर्विकास करून पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर निवासस्थाने ही नादुरुस्त असल्याने बहुतांश पोलीस अधिकारी/कर्मचारी हे शासकीय निवासस्थानात राहत नाहीत. पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेसाठी ८६ नविन शासकीय निवासस्थाने बांधणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे पाठविण्यात आला आहे. पोलीस महासंचालक, म.रा., यांच्याकडून निवासस्थाने व पोलीस ठाणे बांधकाम प्रकल्पास प्राधान्यक्रम निश्चित केला जातो. त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी व बांगूरनगर तसेच धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील बोगस डॉक्टरांबाबत

**(२८) * ४३७२२ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गौंवडी परिसरातील तीन बोगस डॉक्टरांना कोणतीही पदवी नसताना दवाखाने उघडून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांना मुंबई पोलिसांनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबईतील बांगूरनगर पोलिसांनी गोरेगांव-लिंक रोडवरील एका बोगस डॉक्टरास दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे ही खरे आहे काय,
(३) त्याचप्रमाणे धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील एका बोगस डॉक्टराने चुकीचे उपचार केल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाल्याची तक्रार तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात उपरोक्त तिन्ही प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय,

सदर प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २०/२२, भा.दं.वि. कलम ४१९, ४२० सह कलम ३३, ३६ महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायिक अधिनियम १९६१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) होय,

सदर प्रकरणात बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१९/२२, भा.द.वि. कलम ४१९, ४२०, सह कलम ३३, ३६ महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायिक अधिनियम १९६१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एक आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(३) होय,

मुरबाड, जिल्हा ठाणे येथील बोगस डॉक्टर, आरोपीच्या चुकीच्या उपचारामुळे सात जणांचा मृत्यू झाला आहे. सदर प्रकरणात टोकावडे पोलीस ठाणे, जि. ठाणे येथे गु.र.क्र. १३/२०२२, भा.दं.वि. कलम ३०४, ४२० सह महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायिक अधिनियम १९६१ कलम ३३ (२) (अ), ३३-अ, (२), (अ) सह अनुसूचित जाती जमाती अत्याचारास प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे सुधारणा २०१५ चे कलम ३, २(V) व ३, २(V-a) अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(४) उपरोक्त तिन्ही प्रकरणामधील आरोपींना अटक करण्यात आली. या गुन्हयांचा तपास चालू असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोटबी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे अवैध माती व मुरुमाचे उत्खनन आणि वाहतूक केल्याबाबत

**(२९) * ४३६९५ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोटबी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे डहाणू महसूल विभागाने दिलेल्या रॉयल्टीपेक्षा ३५०० ब्रास अधिक माती व मुरुमाचे उत्खनन आणि वाहतूक संबंधित ठेकेदाराकडून केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी डहाणू महसूल उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांच्या पथकाने धाड टाकून उत्खनन करणारे दोन पोकलेन, सहा ट्रक जप्त केले असून उत्खननाचे काम बंद करण्याची कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनापरवानगी जास्त प्रमाणात व बेकायदा माती आणि मुरुमाचे उत्खनन करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या भूमाफिया व ठेकेदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मौजे चरी कोटबी (जि.पालघर) येथील गट क्र.३४१ या ठिकाणी ४४१० ब्रास उत्खनन आढळून आलेबाबत नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, डहाणू यांनी त्यांचे अहवालात व पंचनामा मध्ये नमूद केले आहे. तथापि संबंधितांना ५०० ब्रास माती/मुरूम परवाना तहसिलदार डहाणू या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आला आहे. अतिरीक्त उत्खननाचे ३९१० ब्रास अनुषंगाने संबंधीत जमीन मालक/ठेकेदार यांना दिनांक १४.०२.२०२२ रोजी तहसिलदार, डहाणू यांनी नोटीस दिलेली असून खुलासा मागविण्यात आला आहे.

-----------------

## बाळापुर व अकोट (जि.अकोला) येथे अवैध रेती उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांनी लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत

**(३०) * ४०३७३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.प्रकाश गुणवंतराव भारसाकळे (अकोट)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापुर (जि.अकोला) येथे अवैध रेती उत्खनन करणाऱ्या वाळू माफीयांच्या टोळ्या कार्यरत झाल्या असून वाळू उत्खननातून वाळू माफियांनी लाखो रूपयांचा महसूल बुडविल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अकोट (जि.अकोला) मुंडगाव महसूल मंडळांतर्गत चंद्रीका नदी पात्रातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याने नदीपात्रात खड्डे पडल्याने अपघात झाल्याचे तसेच जेसीबी मशीनद्वारे अवैध रेती उत्खनन करताना तुलंगा (ता.बाळापुर) येथील शिवारात रेतीच्या ढिगाऱ्याखाली दबून दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मजुराचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वाळू माफीयांवर अवैध खनिज चोरी प्रकरणी गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मौजे मुंडगाव, ता.अकोट, जि.अकोला मंडळातील चंद्रीका नदी पात्रातून अवैधरित्या उत्खनन केलेला १० ब्रास रेतीसाठा जप्त करण्यात आला आहे. चंद्रीका नदी पात्रातून अवैध मातीचे उत्खनन केल्याप्रकरणी संबंधीत ०३ वाहन चालकाविरूध्द अकोट पोलीस स्टेशन (ग्रामिण) येथे गुन्हे दाखल करण्यात येवून संबंधिताविरूध्द तहसिलदार, अकोट यांनी दिनांक १५.०१.२०२२ च्या आदेशान्वये रूपये ३,३०,७२०/- इतक्या रक्कमेची दंडात्मक कारवाई केली आहे.

तुलंगा बु., ता. पातूर येथे अशा प्रकारची कोणतीही घटना घडली नाही. परंतु, बाळापुर तालुक्यातील ग्राम धाडी येथे हाताने मातीमिश्रीत रेतीचे काठ हाताने उकरत असताना मातीमिश्रीत रेतीचे ढेकुल डोक्यावर पडल्याने मुकामार लागून

अपघाती मृत्यु झालेला असल्याची घटना घडलेली आहे. त्याअनुषंगाने बाळापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३८/२०२० अन्वये आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

अकोला जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी तालुकास्तरावर दक्षता पथकाची नियुक्ती तर गाव स्तरावर ग्रामदक्षता समितीची स्थापना करण्यात आल्या आहेत.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील वारजे शिवणे हद्दीत मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(३१) * ४३७३६ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वारजे शिवणे हद्दीत मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा तसेच वाळू उपसण्यासाठी खाचरे देखील तयार केली असून ज्याठिकाणी वाळू काढण्यात आली त्या भागात नदीचे पात्र एकदम उथळ झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदी पात्रातून विजेच्या अति उच्च दाबाच्या वीजवाहिन्या गेल्या असून वाळू व माती उकरल्याने अनेक वीज खांबांचा पाया कोरला गेला असून ते खिळखिळे झाल्यामुळे पावसाळ्यात वीज खांब तारांसह पाण्यात पडून या ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असून याबाबत संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचेही समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) दिनांक २५/१/२०२२ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने मौजे शिवणे येथील ब्ल्यू लाईन स.नं.८०/९ या क्षेत्रामध्ये स्थळपाहणी केली असता वाळूचे उत्खनन झाल्याचे आढळून आलेले नाही. तसेच मुठा नदीपात्रामध्ये दिनांक २५/१/२०२२ ते २७/१/२०२२ या कालावधीमध्ये तहसिलदार, हवेली यांच्या अधिनस्थ भरारी पथक व पोलीसांमार्फत रात्रीच्या वेळेस पाहणी केली असता, गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करणारे इसम, वाहने व यंत्रसामुग्री आढळून आली नाही.

तसेच उक्त ठिकाणी महावितरण कंपनीची २२ के.व्ही.राठी बेहरे ओव्हरहेड लाईन आहे. सदर ओव्हरहेड लाईनचे खांब सुस्थितीत असून कोणताही धोका निर्माण झाला नाही. तसेच सदर नदीपात्रातून ११ के.व्ही.विद्युत वाहिनी जात असून ती बंद अवस्थेत आहे. त्यास कोणताही विद्युत पुरवठा जोडला गेला नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित वा वित्तहानी होण्याचा धोका नसल्याचे सहायक अभियंता, महावितरण, डहाणूकर शाखा कार्यालय, पुणे यांनी कळविले आहे.

हवेली तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. हवेली तालुक्यात माहे एप्रिल, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३१ प्रकरणी रुपये ३२.३८ लाख इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बीड जिल्हयातील वक्फ बोर्डाच्या जमिनी परस्पर नावावर करुन झालेला गैरव्यवहार

**(३२) *४३१४६ श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात वक्फ बोर्डाच्या जमिनी परस्पर नावावर करुन घोटाळा केल्याप्रकरणी गुन्हे नोंद झाले असून देवस्थान-दर्गाच्या जमीन गैरव्यवहार

प्रकरणी तत्कालीन उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन, बीड यांना अटक करण्यात आली असून उपजिल्हाधिकारी, भूसुधार यांच्यावरही गुन्हे नोंद झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कार्यवाही आष्टी तालुक्यात झाली असून महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने बीड, माजलगाव, गेवराई, परळी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर या तालुक्यातील जवळपास १० हजार एक्करपेक्षा जास्त जमिनीची परस्पर विल्हेवाट लावल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये हिंदु समाजाचे इनाम देवस्थानाचे आठ बनावट खालसा आदेशान्वये इनाम जमीन खाजगी व्यक्तीच्या नावे करण्यात आल्याचे महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खालसा करुन भूखंड माफियांमार्फत प्लॉटिंग करुन कोट्यवधी रुपयांची कमाई करुन मोठ्या प्रमाणावर शासकीय अधिकाऱ्यांमार्फत अनेक प्रकारचे गैरव्यवहार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी वक्फ बोर्डाकडून गुन्हे नोंद करण्यात आले असून महसूल यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही तसेच बनावट खालसा आदेशान्वये खाजगी व्यक्तींच्या नावावर जमिनी करण्यात आलेल्या आहेत त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात हजारो एक्कर देवस्थान-दर्गाच्या जमिनीबाबत चौकशी करून बळकावलेल्या जमिनीबाबत तसेच जमिनी खाजगी व्यक्तींच्या नावावर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

तत्कालीन उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी देवस्थान-दर्गाच्या जमिनींबाबत प्रतिबंधित मालकीच्या अनुषंगाने विविध आदेश पारीत केले आहेत. अशा आदेशांविरुध्द जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन एकूण ७

गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, आष्टी येथे गु.र.क्र.२०५/२०२१ व पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे गु.र.क्र.००५३/२०२२ असे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच, तत्कालीन उपजिल्हाधिकारी, सामान्य, बीड यांनी अशा पारीत केलेल्या आदेशाविरुध्द देखिल गु.र.क्र.२४५/२०२१,गु.र.क्र.२७०/२०२१ व गु.र.क्र.०४७४/२०२१ असे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यानुसार, तत्कालीन उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांना अटक झाली होती.

(२) प्रस्तुत उपप्रश्नामध्ये नमूद तालुक्यांमधील प्राप्त तक्रारींची एकूण संख्या ७५ इतकी असून तक्रार अर्जात नमूद प्रकरणांमधील जमिनीचे एकूण क्षेत्र साधारणपणे २३१८.१६ एकर एवढे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) यासंदर्भातील दिनांक १७.०८.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या निवेदनामध्ये १० देवस्थान-दर्गाच्या इनाम जमिनींचा समावेश असून अशा जमिनीबाबत प्रतिबंधीत मालकी घोषित करण्याबाबतचे आदेश पारीत झाल्याचे दिसून आले आहे. उक्त जमिनीपैकी दिनांक ०९.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये खालसा करण्यात आलेल्या मौजे चिंचपूर येथील इनाम जमीनीबाबत तहसिलदार आष्टी यांनी दिनांक १८.०८.२०२० रोजीच्या आदेशान्वये अकृषिक परवानगी दिली आहे. तसेच सदर जमिनीच्या १३० प्लॉटची खरेदी-विक्री करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(५) व (६) हैद्राबाद इनाम निर्मुलन (रोख अनुदाने) कायदा १९५४ चे कलम २ (ए) मधील तरतूदीनुसार पारित करण्यात आलेल्या आदेशांबाबत शासन निर्देशानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालावर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत निर्देश देण्यात येत असून चुकीच्या पध्दतीने आदेश पारीत झाले असल्यास फेरतपासणीस घेणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## आडगाव (ता.चाळीसगाव, जि.जळगांव) येथे बँकेतील बी.सी. कोडधारकाने नागरिकांची केलेली फसवणूक

**(३३) * ४२९७८ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव (ता.चाळीगाव, जि.जळगाव) येथे बँक ऑफ बडोदा, देवळी शाखेचा बी.सी कोडधारक श्री.नीलेश शिंदे यांनी नागरिकांचा विश्वास संपादन करुन बचत गट, ठेवीदार, पीक कर्जधारक, निवृत्तीधारकांना तसेच निरक्षर महिला व वृध्दांचा गैरफायदा घेऊन लाखो रुपयांनी फसविल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी एजंटच्या विरोधात तक्रार करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन एजंटवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बँकेचे ग्राहक व बचत गट धारक यांनी बँकेमध्ये जमा करण्याकरीता दिलेली रक्कम बँकेत ग्राहकांच्या खात्यामध्ये न भरता आरोपीने परस्पर स्वत:च्या फायद्यासाठी सदर रकमेचा अपहार केला आहे.

सदर प्रकरणी बँक ऑफ बडोदा, देवळीच्या बँक प्रतिनिधीवर (बी. सी. कोडधारक) मेहूणबारे पोलीस स्टेशन, ता. चाळीसगाव येथे गु.र.नं. ४९/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४०६ अन्वये दिनांक ०५.३.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## अँटॉप हिल (मुंबई) येथे मराठी वधू-वर सूचक संकेतस्थळावरुन एका महिलेची लाखो रुपयांची केलेली फसवणूक

**(३४) * ४३७०१ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अँटॉप हिल (मुंबई) येथे मराठी वधू-वर सूचक संकेतस्थळावरुन महिलेशी संपर्क करुन ४५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोन्ही आरोपींनी फसवून घेतलेली रक्कम महिलेला परत मिळवून देण्यासंदर्भात पोलिसांनी तसेच बोगस वधू-वर सूचक संकेतस्थळांवर प्रादेशिक सायबर गुन्हे विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) अँटॉप हिल (मुंबई) येथे मराठी शादी डॉट कॉम या वधू-वर सूचक संकेतस्थळावर बनावट खाते तयार करून एका महिलेशी संपर्क करुन रू.४४,९३,०००/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी मध्यविभाग सायबर पोलीस ठाणे यांनी दिनांक ११.०२.२०२२ रोजी दोन आरोपितांना अटक केली आहे.

सदर प्रकरणी मध्यविभाग सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०३/२०२२ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ भादंवि सह ६६(क)(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर दोन्ही आरोपी सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस दलातील केंद्रावर लेखी परिक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(३५) * ४३७०८ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलामधील १०७६ शिपाई पदासाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास राज्यातील वेगवेगळ्या केंद्रावर लेखी परीक्षेला एक लाखापेक्षा अधिक उमेदवार बसून त्यांची लेखी परिक्षा व मैदानी चाचणी तसेच अर्जावरील फोटो आणि प्रत्यक्षात हजर असलेला उमेदवार यामध्ये साम्य तपासताना आठ उमेदवारांसाठी आठ डमी उमेदवारांनी परीक्षा दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मुंबई पोलीसांकडून करण्यात आलेल्या चित्रीकरणामुळे एका पाठोपाठ एक डमी उमेदवार सापडत गेल्याने गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास येऊन यामध्ये औरंगाबाद आणि आसपासच्या जिल्ह्यांचे संबंध समोर आल्याने पोलीस भरतीचे ज्ञान देणाऱ्या खासगी क्लासेसचा सहभाग असल्याचे आढळले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लेखी परीक्षा आणि त्यानंतर मैदानी चाचणीमध्ये उत्तीर्ण होऊन निवड झालेल्या १०७६ उमेदवारांची वैद्यकीय चाचणी आणि कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया सुरू असताना राज्यातील वेगवेगळ्या भागातून निवड झालेले ४२ उमेदवार बोलावूनही पडताळणीसाठी गैरहजर असल्यामुळे सर्व संशयाच्या भोवऱ्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात पोलीस भरती झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे अंशत : खरे आहे.

उमेदवारांनी डमी उमेदवार बसविले असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सदर १० उमेदवार व ८ डमी उमेदवार अशा एकूण १८ व्यक्तींवर १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) सदर १० गुन्हयांपैकी ४ गुन्हयातील आरोपी हे जिज्ञासा ॲकॅडमी, यलंबाघाट, बीड या पोलीस भरतीचे ज्ञान देणाऱ्या क्लासशी संबंधीत असल्याचे आढळून आले असून अन्य क्लासचा संबंध असल्याचे अद्यापपर्यंत आढळलेले नाही.
(३) वैद्यकिय चाचणी व कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात आलेल्या उमेदवारांपैकी ४२ उमेदवार इतर पोलीस घटकात निवड होणे, कोविड-१९ चा विलगीकरण कालावधी, शासकीय रुग्णालयाचा आरटीपीसीआर चाचणी अहवाल नसणे इ. कारणांमुळे गैरहजर असल्यास या उमेदवारांना पडताळणीशिवाय संशयास्पद न मानता पडताळणी करुनच या उमेदवारांना पुढील प्रक्रीयेमध्ये समाविष्ट करुन घेतले जाईल.
(४) भरती प्रक्रीयेमध्ये आढळून आलेले गैरप्रकार हे वैयक्तिक स्वरुपाचे आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर भूमी अभिलेख कार्यालयातील जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत

**(३६) * ४४११७ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील भूमी अभिलेख कार्यालयात जमीन मोजणीची साडेचार हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जमीन मोजणीसाठी शुल्क भरुनही प्रत्यक्ष मोजणी होण्यासाठी सहा-सात महिन्यांचा कालावधी लागत असल्यामुळे नागरिकांचे अन्य कायदेशीर व्यवहार लांबणीवर पडत असल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नागपूर कार्यालयाचे अधिनस्त कार्यालयाकडे मार्च २०२१ अखेर सर्व प्रकारचे एकूण ३,९८४ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. एप्रिल २०२१ ते जानेवारी २०२२ अखेर एकूण ७,२६७ आवक अशी एकूण ११,२५१ प्रकरणांपैकी ६,९०७ मोजणी प्रकरणे निकाली झालेली असून ४,३४४ प्रकरणे मोजणी करणेवर शिल्लक आहेत.

(२) (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

तथापि, उक्त कार्यालयातील उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्याचे नियोजन करण्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नागपूर कार्यालयाचे अधिनस्त भूकरमापक / लिपीक यांचे १८० पदे मंजूर असून त्यापैकी ३६ पदे रिक्त असल्यामुळे कामावार परिणाम झाला आहे. तथापि, शासनाने दिनांक २०.७.२०२१ नुसार भूमि अभिलेख विभागातील गट- क पदसमूह ४ सवंर्गातील एकूण १०२० रिक्त पदे भरण्यास शासन मान्यता दिली आहे. त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. अधिनस्त कार्यालयामध्ये कामाचे/मोजणी कामाचे प्रलंबितता पडताळणी करुन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच जीपीएस, रोव्हर्स, ईटीएस या अधुनिक उपकरणांचा वापर करून जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्याचे कालबध्द नियोजन करण्यात आले आहे.

-----------------

## सेलू (जि.परभणी) येथील लघु पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत मोडकळीस आल्याबाबत

**(३७) * ४०३४४ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) शहरातील विद्या नगर परिसरात असलेल्या लघु पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत मोडकळीस आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पशुवैद्यकीय दवाखान्यात म्हैस, गाय, वळू श्वान आधी जनावरांवर उपचार, कृत्रिमरितीने गर्भधारणा, गर्भ तपासणी, वळूचे खच्चीकरण तसेच छोट्या-मोठ्या शस्त्रक्रिया लसीकरण आणि जनावरांच्या आजारावर उपचार करण्यासाठी शेकडो पशुपालक पशूंना घेऊन येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पशुवैद्यकीय दवाखान्यात अनेक पदे रिक्त असल्याने पशुपालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी पशुवैद्यकीय दवाखान्याचा पुनर्विकास करून तेथील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) सदर दवाखान्यातील सहायक आयुक्त हे पद सेवा निवृत्तीमुळे दिनांक ३१.०१.२०२२ पासुन रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकिय सर्व चिकित्सालय जिंतुर यांचेकडे सोपविण्यात आला आहे. अन्य सर्व पदे भरण्यात आलेली आहेत.

(४) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सदर पशुवैद्यकीय दवाखाना दुरुस्ती करण्यासाठी रु. १०.०० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देऊन दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच सहायक आयुक्त पशुसंवर्धन हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून भरण्यासाठी शासनाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दुर्तफा रस्त्यांच्या मोकळ्या जागेत उभ्या असलेल्या जुनाट व बेवारस वाहनांबाबत

**(३८) * ४३१०३ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दुर्तफा रस्त्यांच्या मोकळ्या जागेत उभ्या करण्यात येत असलेल्या जुनाट आणि बेवारस वाहनांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जुनाट वाहनांचा सर्व्हे करुन ती वाहने जप्त करण्यात येणार असून जप्त केलेली वाहने सोडविण्यासाठी ४८ तासांत कोणी पुढे न आल्यास ती टाकाऊ म्हणून काढण्यात येणार असल्याबाबतची नियमावली तयार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी दुर्तफा रस्त्यांच्या मोकळ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत शासनाने सदरहू नियमावलीस अंतिमरित्या मान्यता देऊन उक्त वाहनांच्या मालकांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, गृह विभाग शासन परिपत्रक दिनांक ०९/१०/२०१८ व नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक १४/०९/२०१८ व दिनांक ०२/०३/२०२० अन्वये रस्त्यांवर अनधिकृतपणे सोडून दिलेली वाहने, बेवारस वाहने हटविण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून त्यामधील सूचनांनुसार पोलीस व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत संयुक्तिक कार्यवाही करण्यात येते.

बेवारस वाहनांबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सदर वाहने उचलून वाहतूक विभागाच्या आवारात आणून जमा केली जातात. सदर बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध न लागल्याने सन २०१९ मध्ये बेवारस वाहने स्क्रॅप करण्याकरिता ई लिलाव करण्यात आला. तसेच विक्री न झालेली वाहने विल्हेवाट लावण्याकरिता बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या ताब्यात देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्र मिळवून अनेकांनी शासकीय नोकऱ्या मिळविल्याबाबत

**(३९) * ४४०२० श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक व पोलीस भरतीमध्ये घोटाळ्यांची मालिका सुरु असताना बनावट क्रीडा प्रमाणपत्र मिळवून अनेकांनी शासकीय नोकऱ्या मिळविल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच तलवारबाजीत चॅम्पियन असल्याचे सांगत १४ जणांनी पोलीस आणि कर विभागात नोकरी मिळवून सातजण फौजदार पदावर आहेत तर सातजण कर निरीक्षक पदावर असल्याचे क्रीडा आयुक्त श्री.ओमप्रकाश बकोरिया यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीस महासंचालक यांच्याकडे अहवाल पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तलवारबाजी संघटनेचे महासचिव श्री.अशोक दुधारे यांनी प्रमाणपत्र दिल्याचे सदर अहवालात नमूद केले असून त्यांनी आपल्या स्वाक्षरीचा दुरुपयोग झाला असून सदर बनावट प्रमाणपत्रात सहभाग नसल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरप्रकारासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी, बोगस क्रीडा प्रमाणपत्राआधारे शासन सेवेत पोलीस उपनिरीक्षक, राज्यकर निरीक्षक, इ. पदांवर नियुक्त झालेल्या उमेदवारांचे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल रद्द केल्याचे नमूद करुन, सदर उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अर्हता पात्र ठरत नसल्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३०.०९.२०२१ च्या पत्रान्वये अवगत केले आहे.

(३) व (४) तलवारबाजी संघटनेचे महासचिव यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये संबंधित खेळाडूंना दिलेल्या प्रमाणपत्रातील माहिती ही संघटनेच्या अभिलेखावरुन देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. बोगस प्रमाणपत्राआधारे शासन सेवेत रुजू झालेल्या उमेदवारांच्या व त्यांना प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या संबंधितांविरुद्ध फ़ौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेहलोळी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथे बर्ड फ्लूमुळे कोंबड्या मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(४०) * ४४११९ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेहलोळी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथे सुमारे ३०० हून अधिक देशी कोंबड्या आणि फार्ममधील काही बदके बर्ड फ्लूमुळे मृत पावल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रोगाचा फैलाव इतरत्र होऊ नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या तसेच पक्षी मृत्युमुखी पडल्यामुळे पोल्ट्री मालकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १६.०२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये वेहलोळी या बाधीत केंद्रापासून १ कि.मी. परिघातील परिसर बाधीत क्षेत्र व १ ते १० कि.मी. परिघातील क्षेत्र सर्व्हेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केले.

बर्ड फ्ल्यू रोग नियंत्रण संदर्भातील केंद्र शासनाच्या सन २०२१ मधील सुधारीत कृती आराखडयानुसार दिनांक १७.०२.२०२२ ते दिनांक १९.०२.२०२२ या कालावधीत वेहलोळी येथील १ कि.मी. परिघातील २३,८१७ कुक्कुट पक्षी जाणीवपूर्वक नष्ट करण्यात आलेले आहेत. तसेच १,६९० अंडी व ३,९६३ कि.ग्रॅ. पक्षीखाद्य शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आलेले आहे. प्रभावित परिसरात दिनांक २१.०२.२०२२ रोजी निर्जंतुकरणाचे काम पुर्ण झाले असून तसे प्रमाणपत्र

केंद्र शासनास सादर करण्यात आलेले आहे. सदर बाधित क्षेत्रात कुक्कुट पक्षी वाहतुकीवर तसेच पुढील ९० दिवस कालावधीत पक्षांचे संगोपन करण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

शासन निर्णय २०.०१.२०२१ नुसार बाधीत क्षेत्राच्या १ कि.मी. परिघातील जाणीवपुर्वक नष्ट करण्यात आलेले २३,८१७ कुक्कुट पक्षी, १,६९० अंडी आणि ३,९६३ कि.ग्रॅ. पक्षीखाद्य यांची शेतकरी / कुक्कुट व्यावसायिक यांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर रोग प्रादुर्भावाच्या अनुषंगाने राज्यात सतर्कता बाळगणे बाबत सर्व क्षेत्रिय यंत्रणा, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आयुक्त, आरोग्य सेवा, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर व अध्यक्ष पोल्ट्री फार्म ॲन्ड ब्रीडर्स असोसिएशन, महाराष्ट्र यांना देखील सतर्कता बाळगणे व आवश्यक त्या सहकार्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.